

सातव्या बॅचच्या स्वागत कार्यक्रमास उपस्थित डॉ. भीमराया मेत्री, प्रा. प्रकाश अवस्थी, प्रा. वर्षा खांडेकर.

# आयआयएममध्ये आली सातवी बॅच

नागपूर : इंडियन इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट येथे पदव्युत्तर व्यवस्थापन अभ्यासक्रमाच्या सातव्या बॅचमधील विद्यार्थ्यांचे स्वागत सोमवारी करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात पहिल्या पीएचडी बॅचमधील विद्यार्थ्यांसाठीही स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता.

संस्थेचे संचालक डॉ. भीमराया मेत्री यांनी आयआयएम नागपूरबद्दल यावेळी माहिती दिली. विविध देशांमधील विद्यापीठांशी असलेले संबंध, कॉर्पोरेट क्षेत्रात काम करणारे माजी विद्यार्थी तसेच येत्या काळात करावयाचा विस्तार याबद्दल त्यांनी माहिती दिली. अभ्यासक्रमाचे अध्यक्ष प्रा. प्रकाश अवस्थी यांनीदेखील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. प्रवेश विभागाच्या अध्यक्ष प्रा. वर्षा खांडेकर यांनी नव्या विद्यार्थ्यांचे स्वागत केले. वीसपेक्षा जास्त राज्यांमधील विद्यार्थ्यांनी यंदा या संस्थेत प्रवेश घेतला असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी, २०२०-२२ या बॅचमधील पुरस्कार विजेत्यांची घोषणा करण्यात आली. नव्या विद्यार्थ्यांसाठी ६ ते ११ जुलैदरम्यान ओरिएंटेशन कार्यक्रमाचे आयोजन संस्थेने केले आहे. त्याचप्रमाणे या आठवड्यात होणाऱ्या व्याख्यानमालेबद्दलही माहिती देण्यात आली. या ऑनलाइन कार्यक्रमाला प्राध्यापक, कर्मचारी, वरिष्ठ विद्यार्थी आणि २०२१-२३ या बॅचचे विद्यार्थी व त्यांचे पालक उपस्थित होते.